अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## राहुल द्रविड भारताच्या मुख्य प्रशिक्षकपदी कायम

**मुंबई :** राहुल द्रविडच भारतीय संघाचा मुख्य कोच म्हणून काम पाहणार आहे. बीसीसीआयने याबाबत अधिकृत माहिती दिली. राहुल द्रविडसह सर्व सपोर्ट स्टापचा कालावधी वाढवण्यात आला आहे. वनडे विश्वचषका २०२३ च्या फायनलनंतर राहुल द्रविडचा कार्यकाळ संपला होता.

बीसीसीआयने राहुल द्रविड याला कार्यकाळ वाढवण्याची विनंती केली होती. राहुल द्रविड यानेही ही ऑफर स्विकारली आहे. व्हीव्हीएस लक्ष्मण एनसीए प्रमुख म्हणूनच काम पाहणार आहे. त्याशिवाय तो स्टँड इन मुख्य कोच असेल. म्हणजेच, राहुल



द्रविडच्या अनुपस्थितीत लक्ष्मण भारतीय संघाला धडे देणार आहे. राहुल द्रविड यांनी गेली २० वर्ष भारतीय क्रिकेट संघासोबत एक खेळाडू, कर्णधार आणि प्रशिक्षक म्हणून प्रवास केला. राहुल द्रविडच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने २०२२ टी २० विश्वचषकाची उपांत्य फेरी गाठली होती. त्याशिवाय २०२१-२३ चॅम्पियन्स ट्रॉफीची फायनलही गाठली. तसेच २०२३ विश्वचषक फायनलही गाठली होती. फायनलमध्ये ऑस्ट्रेलियाकडून पराभवाचा सामना करावा लागला. भारतीय संघाने लागोपाठ १० सामन्यात विजय मिळवला होता. रोहित शर्मा व निवड समिती प्रमुख आगरकर या दोघांनीही द्रविडचा कार्यकाळ वाढवण्यात यावा असे मत व्यक्त केले होते.

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. ३० नोव्हेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ६१ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# ‘अवकाळी’ने बळीराजाच्या तोंडचे पाणी पळवले

### ज्वारी आडवी झाली... हरभऱ्याचा फुलोरा गळून पडला

### खरीपानंतर रब्बी पिकांचीही मोठ्या प्रमाणात हानी

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर शहरासह जिल्ह्याला मंगळवारी मध्यरात्री मुसळधार पावसाने झोडपून काढले. या अवकाळी पावसाने सर्वच तालुक्यांमधील खरीप आणि रब्बी पिकांची मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे.वादळी वाऱ्यामुळे ज्वारीचे पीक आडवे झाले असून हरभऱ्यावरचा फुलोरा गळून पडला आहे. जोरदार पावसामुळे शहराच्या कुंभारवेसमधील नाल्याला पाणी आले होते.त्यात वाहून गेल्याने एका तरूणाचा मृत्यू झाला.**

गेल्याच आठवड्यात हवामान खात्याकडून अवकाळी पावसाचा अंदाज दिला गेला होता. परंतु सोलापुरात केवळ ढगाळ हवामान होते मात्र, मंगळवारी मध्यरात्रीनंतर ढगांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाटात जोरदार पर्जन्यवृष्टी झाली. ग्रामीण भागात या पावसाने ज्वारीसह मका, गहू, द्राक्षे व अन्य पिकांची प्रचंड हानी झाली आहे.

त्यामुळे शेतकरी आणखी अडचणीत सापडला आहे. सोलापुरात मंगळवारी संध्याकाळी सातनंतर अवकाळी पावसाला सुरुवात झाली. रात्री उशिरा पावसाने जोर धरला होता. या पावसाचा जोरदार तडाखा सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीला बसला असून त्यात मोठ्या प्रमाणात कांदा भिजला आहे. आधीच कांद्याची आवक वाढल्याने कांदा दर कोसळले आहेत. यातच कांदा पावसात भिजल्याने दरात आणणी घसरणीची भीती व्यक्त होत आहे. जिल्ह्यात गेल्या तीन-चार दिवसांपासून ढगाळ हवामान असताना अखेर अनेक ठिकाणी





मुसळधार पावसाने दक्षिण सोलापूर तालुक्यात द्राक्ष बागांमध्ये तळ्याचे स्वरुप आले होते. भंडारकवठे भागात ज्वारीचे पिक आडवे झाल्याचे दृश्य.

**जिल्ह्यात तालुका निहाय पडलेला पाऊस मिमीमध्ये याप्रमाणे**
सांगोला-३१, अक्कलकोट-२८.२, माढा-२७.४, करमाळा-२५.४, उत्तर सोलापूर-२४.५, माळशिरस-२३.६, मोहोळ-२३.१, बार्शी-२३, पंढरपूर-२०.३, मंगळवेढा-१७.७ आणि दक्षिण सोलापूर-१२.८ याप्रमाणे एकूण सरासरी २५ मिलीमीटर अवकाळी पावसाची आकडेवारी आहे.

मोठ्या प्रमाणावर अवकाळी पाऊस झाला. त्यामुळे पिकांचे नुकसान झाले आहे. एकीकडे पावसाअभावी खरीप हंगाम वाया गेला असताना त्या पाठोपाठ रब्बी हंगामातही पावसाने साथ न दिल्यामुळे पिके धोक्यात आली आहेत. ज्वारी, गहू आदी पिकांना मात्र पोषक वातावरण दिसत असताना या पावसाने ज्वारी, गहू, मका, हरभरा, द्राक्षे, कांदा आदी पिंकांची मोठ्या प्रमाणावर हानी झाली आहे.यातच वादळी वाऱ्यांची भर पडल्याने शेतकऱ्यांपुढील संकट अधिक गहिरे झाले आहे. ज्वारीचे कोठार मानल्या जाणाऱ्या मंगळवेढा,दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्यांमध्ये हेच चित्र दिसून आल्यामुळे तेथील शेतकरी धास्तावला आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप, भंडारकवठे परिसरात पावसाचा फटका बसला.

### अवकाळीग्रस्त भागाला सर्व पालकमंत्री भेट देणार

राज्यातील बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत देण्याकरिता निधी मागणीचे प्रस्ताव सर्व जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त करून घेऊन निधी वितरित करण्याचे एकत्रित प्रस्तावावर विभागाने तातडीने निर्णय घेण्याचे निर्देश मंत्रिमंडळाने बुधवारी दिले.दरम्यान सर्व पालकमंत्र्यांनी आपापल्या जिल्ह्यात जावून पंचनाम्यावर लक्ष ठेवण्याची सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.बुधवारी मदत व पुनर्वसन तसेच कृषी विभागाने राज्यातील पडलेल्या अवकाळी पाऊस आणि गारपीट याबाबत सादरीकरण केले. पंचनामे प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे तातडीने करण्याचे आदेश सर्व जिल्हाधिकारी यांनी सर्व क्षेत्रीय यंत्रणांना द्यावेत व ३३ टक्क्यांपेक्षा जास्त शेती पिकांचे नुकसान झालेल्या प्रकरणी निधी मागणीचा प्रस्ताव तत्काळ शासनाकडे पाठविण्याची व्यवस्था करावी, असे औपचारिक निर्देश महसूल व वन (आपत्ती व्यवस्थापन) विभागाने सर्व जिल्हाधिकारी यांना कालच दिल्याची मंत्रिमंडळाने नोंद घेतली.

## सांगोल्यात तीन महिन्यांपासून परप्रांतीयांकडून डिझेलची चोरी

सुराज्य/सांगोला

- **दीड लाखांच्या इंधनाची चोरी, गुन्हा दाखल**
- **नाथबाबा खडी क्रशर डांबर प्लॉंट येथील प्रकार**

गेल्या तीन महिन्यांपासून सांगोला तालुक्यातील एका खडीक्रशन प्लॉंटमधून डिझेलची चोरी करून परस्पर विक्री करणाऱ्या चौघा परप्रांतीय कामगारांसह एका स्थानिक कामगाराविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

निजामपूर येथील नाथबाबा खडी क्रशर डांबर प्लॉंट येथे तीन महिन्यांपासून परप्रांतीय कामगारांनी खडी क्रशर मालकाच्या परस्पर त्यांच्या स्वतः चे आणि भाड्याने घेतलेल्या जेसीबी पोकलेन टिप्पर आदी २२ वाहनांच्या टाकीमधून सुमारे एक लाख ५६ हजार रुपये किमतीचे १७०० लिटर डिझेलची चोरून विक्री केला. हा प्रकार दि. २७ नोव्हेंबर रोजी रात्री दहा वाजता निजामपूर येथे उघडकीस आला. याबाबत योगेश बाबासाहेब खटकाळे (अकोला, सांगोला) यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. त्यांनी खडीक्रशर प्लॉंट येथे जाऊन





मन्जय गंगासाह (बिहार) या परप्रांतीय कामगाराची झडती घेतली. त्यावेळी त्यांनी त्याला तुम्ही कोणकोण वाहनांमधील डिझेलची चोरी करीत असता, असे विचारले असता त्याने माझ्यासोबत गर्जेद्रकुमार, मुन्ना यादव, राजकुमार हे सर्व परप्रांतीय आणि अंकुश दबडे (राजुरी) असे सर्वजण मिळून प्लास्टिक कॅनमध्ये डिझेल चोरी करीत असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

### अश्लिल चाळे करणाऱ्या पित्याविरोधात गुन्हा

**सोलापूर :** चौदा वर्षाच्या सावत्र मुलीला धंद्यावर बसवतो, असे म्हणत तिच्याशी अश्लील चाळे करणाऱ्या सावत्र पित्याच्या विरोधात पत्नीने तक्रार दिल्याने त्याच्याविरुद्ध जोडभावी पोलीस ठाण्यात विनयभंग, लैंगिक छळाचा गुन्हा नोंदला आहे.

पिडितेची आई ही शहरातील एका वस्तीमध्ये राहते. भाजीपाला विक्री व्यवसायातून ती आपल्या कुटुंबाची उपजीविका करते. तिला दोन मुली, एक मुलगा आहे. पिडितेच्या आईचे पूर्वी एका तरुणाशी लग्न झाले होते. त्यापासून दोन मुली झाल्या. काही वर्षांनी दोघांचे न पटल्याने पिडितेच्या आईने दुसऱ्याशी लग्न केले. दहा-बारा वर्षानंतर त्याच्याशीही भांडण झाल्यामुळे अडीच वर्षांपूर्वी तिसऱ्याशी लग्न करुन ते एका वस्तीत राहत होते. गेल्या महिन्यात तिसऱ्या पतीने १४ वर्षाच्या पिडित मुलीचा हात पकडून ’तिच्याशी अश्लिल हावभाव केले.

## नाल्यातील पाण्यात बुडून विवाहित तरूणाचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर

शहरात झालेल्या धुंवाधार पावसामुळे कुंभार वेस भागातील नाल्यात सलाम साबीर दलाल (वय- ३५, जोडभावी पेठ) हा तरुण मंगळवारी मध्यरात्री वाहून गेला. त्याचा मृतदेह बुधवारी सापडला.



पहाटेच्या सुमारास अवकाळी पावसाचा जोर वाढला असताना पाऊस अंगावर झेलत सलाम दलाल हा दुचाकीने घरी परत येत होता. परंतु, कुंभार वेशीतील नाल्यातून पाणी रस्त्यावर आल्याने दुचाकी घसरल्याने सलाम दलाल हा कोसळला. पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने प्रवाहासोबत तो वाहून गेला. त्यातच त्याचा मृत्यू झाला. मृत सलाम दलाल यास तीन महिन्यांच्या तान्हुल्या बाळासह तीन मुले असून, ती अनाथ झाली आहेत. मुंबईत झालेल्या २६/११/ च्या दिवशी दहशतवादी हल्ल्यात त्याचे वडील साबीर दलाल हे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवर दहशतवाद्याची गोळी लागल्याने जखमी झाले होते. काही महिन्यापूर्वी त्यांचा मृत्यू झाला होता. या घटनेस दोनच दिवसांपूर्वी १४ वर्षे पूर्ण झाली होती. काही महिन्यापूर्वी त्यांचाही मृत्यू झाला होता.

त्यांच्या पश्चात कुटुंबातील कर्ता असलेल्या सलाम याचाही अवकाळी पावसाने बळी घेतला होता. मृत सलाम दलाल याला एकूण तीन मुले आहेत. अवघ्या तीन महिन्याचा बाळ आहे. पाच आणि तीन वर्षांची दोन मुले आहेत. आता कुटुंबातील कर्ता असलेल्या सलाम याचा ही मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## सराईत चोरट्याकडून घरफोडीतील १.९७ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

सुराज्य/सोलापूर

सराईत घरफोडीतील आरोपीला जेरबंद करून पोलिसांनी त्यांच्याकडून १.९७ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्त केला आहे.

सोलापूर शहरात मालाविषयक गुन्हे घडत असल्याने ते गुन्हे उघडकीस आणण्यासंबंधी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार गुन्हे शाखेचे सर्व अधिकारी व पोलीस कर्मचारी प्रयत्नशील होते. शुक्रवार, दि २४ नोव्हेंबर रोजी सपोनि संदीप पाटील आणि त्यांच्या पथकास मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार घरफोडी चोरी गुन्ह्यातील ’पाहिजे’ असलेला आरोपी गुड्या पवार (मोहोळ) याला चोरीतील सोन्या-चांदीचे दागिने विक्रीसाठीच्या प्रयत्नात असताना जुना कारंबा नाका येथे ताब्यात घेतले. त्याच्या ताब्यातून १.९७ लाख रुपयांचा किंमतीचा मुद्देमाल हस्तगत





केला. राजू ऊर्फ गुड्या मधूकर पवार, (वय-२५, पेनूर, मोहोळ) यास ताब्यात घेतल्यावर सपोनि पाटील आणि त्यांच्या पथकाने कौशल्यपूर्वक तपासात नमूद महिलेने ऑगस्ट-२०२३ ते नोव्हेंबर-२०२३ या कालावधीत त्याच्या आणखीन एका साथीदारासह सोलापूर शहरातील दिवसा आणि रात्री बंद घर फोडल्याचे तसेच उघड्या घरात चोरी व शेळी चोरी केल्याचीही कबुली दिली. त्यानुसार गुन्ह्यातील सोन्या-चांदीचे दागिने काढून दिले. त्यानुसार ०७ गुन्हे उघडकीस आणून ५८ ग्रॅम सोन्याचे दागिने व ३२५ ग्रॅम चांदीचे दागिने असा एकूण १.९७ लाख रुपयांचा किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. आरोपी राजू ऊर्फ गुड्या मधुकर पवार हा एमआयडीसी, विजयपूर नाका, फौजदार चावडी, जोडभावी पेठ पोलीस ठाण्याकडील सात गुन्ह्यातील पाहिजे आरोपी आहे. ही कामगिरी पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने, पोलीस उपायुक्त (गुन्हे) डॉ. दीपाली काळे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) प्रांजली सोनवणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक (गुन्हे शाखा) सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली, सपोनि संदीप पाटील, पोलीस अंमलदार विजयकुमार वाळके यांनी पार पाडली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



’रंग बदलण्यात’ मलाही त्यांनी मागे टाकलेय !

कल्याण
230-56-169

मुंबई
259-69-180

## अवकाळी पावसाच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे सुरु करा

### जिल्हाधिकारी यांनी दिले आदेश; तीन दिवसात पंचनामे होणार पूर्ण

सुराज्य/सोलापूर

हवामानात अचानक बदल झाल्यामुळे अवकाळी पावसाने मंगळवारी रात्री जिल्ह्याच्या काही भागात जोरदार हजेरी लावली आणि अक्कलकोट, उत्तर आणि दक्षिण तालुक्यात अवकाळीच्या मुसळधारा कोसळून मोठ्या प्रमाणात शेती पिकांचे नुकसान झाले आहे.

नुकसानग्रस्त भागातील पिकांचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सर्वच तालुक्यातील तहसीलदार, मंडलाधिकाऱ्यांना बुधवारी दिले आहेत. खरीप हंगामात पावसाने मोठा खंड घेतल्यानंतर शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने रब्बी हंगामाची पेरणी केली होती. पिके व्यवस्थित वाढ अवस्थेत असताना अचानक हवामानात बदल होवून मंगळवारी रात्री जिल्हयातील काही महसुल मंडळामध्ये पावसाने जोरदार हजेरी लावली. यामुळे रब्बी हंगामातील द्राक्ष बाग, पपई, ऊस, कांदा, तूर, ज्वारी व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे.



सदर पावसाने झालेल्या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश दिले आहेत. या नुकसान झालेल्या पिकांचे गावनिहाय पंचनामे तलाठी, कृषी सहाय्यक, ग्रामसेवक यांच्या मार्फत तीन दिवसात जिओ टॅग फोटोसह पंचनामे करुन सदर पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. दक्षिण सोलापुरात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

**पिकांचे नुकसान मात्र जिवीतहानी नाही :** मंगळवारी रात्री जिल्ह्यात विजांच्या कडकडाटात अचानक आलेल्या या अवकाळी पावसामुळे पिकाचे नुकसान झाले असलेतरी जिवीतहानी, पशुहानी कोठेही झाली नसल्याची माहिती जिल्हा आपत्ती विभागाकडून देण्यात आली.

**हिप्परगा तलावाच्या पाणीपातळीत वाढ :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळे येथील ओढा पावसामुळे पाण्याने भरून वाहू लागल्याने या भागातील काही शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनी नराजी व्यक्त केली. या गावात काही ठिकाणी विजेचे पोलही उन्मळून पडले आहेत. दरम्यान, उळे, कासेगाव, खडकी आदी भागात जोरदार वृष्टी झाल्याने येथील ओढ्याला पूर येवून हिप्परगा तलावाच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली आहे.

## आमदार अपात्रप्रकरणी नवीन वेळापत्रक जारी

**मुंबई :** शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी विधानसभा अध्यक्षांसमोर सुरू असलेल्या सुनावणीबाबत नवी अपडेट समोर आली आहे. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सुनावणी बाबतचे नवीन वेळापत्रक जारी केले आहे. या नवीन वेळापत्रकानुसार, शिंदे गटाच्या नेत्यांचीही उलटतपासणी ठाकरे गटाचे वकील करणार आहेत.



सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांना ३१ डिसेंबरपर्यंत अंतिम निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे राहुल नार्वेकर यांना या प्रकरणात सुनावणी आटोपताना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. त्यामुळे अध्यक्षांना ओव्हर टाईम करावा लागणार आहे. काही दिवसांपूर्वी झालेल्या सुनावणीत विधानसभा नार्वेकर यांनी सुनावणीतील साक्ष नोंदवणे, उलट तपासणीतील संथगतीबाबत नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर वेळापत्रक जारी केले होते. आता, त्यात विधानसभा अध्यक्षांनी पुढील महिन्याबाबतचे वेळापत्रक जारी केले आहे. या वेळापत्रकानुसार, ठाकरे गटाचे प्रतोद यांची उलटतपासणी ३० नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे.